# जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
## जिल्हा न्यायालय ईमारत, नगर रोड, बीड - 431122.

:- 02442- 221203 Email Address:- mahbeedc@mhstate.nic.in

जा.क्र. / लेखा / 9778 / 2026
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
दिनांक : 07 / 10 / 2026

## ***<u>निविदा सुचना</u>***

**विषय : अग्नीशामक नळकांडयाचे ( Fire Extinguisher Refilling ) पुर्नभरणा करण्यासाठी निविदा पाठविणे बाबत..**

जिल्हा न्यायालय, बीड येथील नवीन इमारतीमधील एकुण 45 नग आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या शासकीय निवासस्थामधील 10 नग असे एकुण 55 नग 9 किलो वजनाच्या **ए.बी.सी. ईत्यादी ड्राय पावडर टाईपचे** आणि जिल्हा न्यायालय इमारतीमधील 9 नग CO2 चे असे सर्व मिळून एकुण 64 नग अग्नीशामक नळकांडयाचे पुर्नभरण करुन देण्यासाठी सर्व करासहीत आपणाकडुन बंद पाकीटामध्ये निवीदा दिनांक 14 / 10 / 2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत जिल्हा न्यायालय, बीड येथे पोहोचेल अशी पाठवावी. वरील निवीदा खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील व निवीदा स्विकारणेचा हा पूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड यांचा राहिल. सदरील बंद पाकीटावर **" अग्नीशामक नळकांडयाचे पुर्नभरण करिता निविदा"** असे लिहिणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :--**

01. निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर जी.एस.टी./एस.जी.एस.टी. क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. जर नसेल तर तत्सम प्राधिकारणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील पदपत्रक वैध असतील.
02. निविदाकारांनी निविदा / दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.
03. प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा / दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
04. सदरील निविदेमध्ये दर्शविल्याप्रमाणे अग्निशामक नळकांडयांची संख्या कमी / जास्त होण्याची शक्यता आहे.
05. अग्निशामक नळकांडयांची पुनर्भरण करणे किंवा रद्द करणेबाबत सर्व अधिकारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, बीड यांना राहिल.
06. काही वाद उद्‌भवल्यास न्यायक्षेत्र हे बीड जिल्हा न्यायालय राहिल.
07. **अग्निशामक नळकांडयांतील जुनी पावडर ही जिल्हा न्यायालय, बीड येथे पुर्णपणे रिकामी करूनच पुनर्भरण करण्यात यावी.**
08. कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

आदेशावरून

प्रबंधक 7/10
जिल्हा न्यायालय,बीड.